प्रसिध्दी पत्रक          दिनांक. २१/०६/२०२३

**आरोपी लोकसेविका संगीता नामदेवराव वाघमारे , मपोह/१३१५ नेमणुक पोलीस स्टेशन पाथरी जि.परभणी यांनी तकारदार यांना त्यांचेविरुध्द दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी ५०००/- रूपये लाचेची मागणी ५०००/-रु. लाच स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांचे जाळयात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी युनिट. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.पाथरी, जिल्हा परभणी गु.र.न. २७० /२०२३<br>कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख वेळ | दि.२०/०६/२०२३ रोजी २३:३० वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता. | संगीता नामदेवराव वाघमारे , मपोह/१३१५ नेमणुक पोलीस स्टेशन पाथरी जि. परभणी रा. पोलीस वसाहत, पोलीस मुख्यालय, परभणी. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०००/- रु. ( पाच हजार रूपये ) |
| लाचेची स्विकारली रक्कम | ५०००/- रु. ( पाच हजार रूपये ) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्या घरासमोरील जायकवाडी प्रकल्पाच्या जागेत अतिक्रमण करून तेथे राहणारे व अवैध व्यवसाय करणारे लोकांचा त्रास तक्रारदार यांना होत असल्यामुळे ते उपोषणाला बसले होते. प्रकल्पाचे जागेत अतिक्रमण करून राहणारे व्यक्तीने तक्रारदार यांचेवर पोलीस स्टेशन पाथरी येथे गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार यांना त्यांच्या विरुध्द दाखल असणा-या गुन्हयात मदत करण्यासाठी आरोपी लोकसेविका मपोह/संगीता वाघमारे या त्यांना लाचेची मागणी करीत असल्याने दिनांक २०.०६.२०२३ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे मपोह/संगीता वाघमारे यांनी तक्रारदार यांना पंचासमक्ष ५०००/- रु लाचेची मागणी केली. त्यावरुन करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेविका मपोह/संगीता वाघमारे यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम ५०००/- रु पंचासमक्ष सुविधा मार्ट, ओंकार नगर पाथरी या मॉलमध्ये स्विकारले आहेत. त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असुन पो.स्टे.पाथरी जि.परभणी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही डॉ. श्री. राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी श्री. अशोक इप्पर, पोलीस उप अधिक्षक,ला.प्र.वि परभणी तसेच सापळा अधिकारी श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, पोह/ चंद्रशेखर निलपत्रेवार,मपोह/सिमा चाटे, पोशि/कल्याण नागरगोजे , शेख जिब्राइल आणि चापोह/जर्नाधन कदम लाप्रवि युनिट परभणी यांनी पार पाडली आहे.. |
| गुन्हयाचे तपास अधिकारी | श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि युनिट परभणी. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवक/इसमा विरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.


| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी नानलपेठ पोलीस ठाण्याच्या बाजूला नानलपेठ परभणी | |
|---|---|
| संपर्क क्रमांक :– **02452–220597**<br>टोल फ्री क्रमांक:– **1064** | ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन acbmaharastra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उप अधीक्षक 9850483337 |
| spacbnanaded@gmail.com | dyspacbparbhani@gmail.com |
| **Facebook : Acb Parbhani** | **Twitter : @ACBPARBHANI** |
| **Instagram : acbparbhani** | **Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani.** |
| **Online Complaint : acbmaharashtra.net** | |


पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी